Rotary
Club of Beed Midtown
THE MAGIC OF ROTARY
# MIRRॅOR
अंक-६ Club No. 27961 RI Year 2024-25 दि. २५ नोव्हेंबर २०२४

## जागतिक पोलिओ दिनानिमित्त जनजागृती रॅलीने 'रोटरी एन्ड पोलिओ नाउ' नारा दुमदुमला











जागतिक पोलिओ दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनतर्फे संपुर्ण बीड शहरामध्ये जनजागृती रॅली आयोजित करण्यात आली होती. या रॅलीमध्ये बीड जिल्ह्याचे सिव्हील सर्जन मा.डॉ. अशोक थोरात व त्यांचा संपुर्ण आरोग्य क्षेत्रातील स्टाफ सहभागी झाला होता. या रॅलीत रोटरीचे पी.डी.जी. रो.हरिष मोटवाणी, अध्यक्ष रो.इंजि. नितीन गोपन, सचिव रो.डॉ. निलेश जगदाळे, प्रोजेक्ट चेअरमन रो.बालाजी घरत तसेच सर्व रोटरी मेंबर उत्साहाच्या वातावरणामध्ये सहभागी झाले होते. ही रॅली बीड जिल्हा रुग्णालय येथून ते शिवाजी पुतळा मार्गे बीड सिव्हील येथे समारोप करण्यात आला.

### प्रोजेक्टस् क्षणचित्रे

* बीड जिल्हा रुग्णालय येथून संपुर्ण बीड शहरात ही रॅली संपन्न झाली.
* सिव्हील सर्जन डॉ.अशोक थोरात यांनी जनजागृती रॅलीबद्दल रोटरीचे विशेष कौतुक केले. तसेच जगभरात रोटरीने पोलिओ निराकरणासाठी विशेष योगदान दिले आहे असे मत व्यक्त केले.



RI President :
Rtn. Stephanie Urichick



District Governor :
Rtn.Dr. Suresh Saboo



Assitant Governor :
Rtn. Ganesh Mule



President
Rtn.Er.Nitin Gopan



Secretary
Rtn.Dr.Nilesh Jagdale



Editor :
Rtn.Balaji Gharat

## रोटरी क्लब व अनिल दादा जगताप मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने एस.टी.चालक व वाहक कर्मचाऱ्यांसाठी बी.पी., शुगर, नेत्रतपासणी, चष्मे वाटप व मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीर संपन्न







रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनच्या वतीने एस.टी. चालक, वाहक व कर्मचाऱ्यांकरिता मोफत बी.पी., शुगर, नेत्रतपासणी, चष्मे वाटप व मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीर बीड बसस्टँड या ठिकाणी १६ व १७ ऑक्टोबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आले होते. यामधील एस.टी. चालक व वाहक यांचे धगधगीच्या दिनचर्येमध्ये आरोग्याची काळजी घेणे शक्य होत नाही त्यामुळे आरोग्याच्या विविध समस्या जाणवतात. एस.टी. वाहक व चालक यांच्यावरती बसमध्ये प्रवास करणारे असंख्य नागरिक असतात व त्यांची संपुर्ण जगणे मरण्याची जबाबदारी वाहक यांच्यावरती असते त्यामुळे त्यांचे आरोग्य व्यवस्थित राहणे आवश्यक आहे. म्हणून रोटरीने एस.टी.वाहक, चालक व कर्मचारी यांची विविध तपासण्या करून त्यांना सुदृढ करण्यात आले. यामध्ये शरीरामधील बी.पी.चे प्रमाण, रक्ताच्या माध्यमातून विविध तपासण्या आणि दृष्टीमध्ये असणारे विविध दोष तपासून त्यांना नंबरचे चष्मे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर ज्यांना मोतीबिंदूचा त्रास जाणवत होता, त्यांना तज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून मोफत ऑपरेशन करण्यात आले. या शिबीराला यशस्वी करण्यासाठी प्रोजेक्ट चेअरमन रो.सुर्यकांत महाजन, अध्यक्ष, सचिव तसेच चंपावती नेत्रालय बीड यांची तज्ञ टीम यांनी विशेष सहकार्य केले.



।। महावीराय नमः ।।
राजेश बंब यांचे
जैंन पत्रा & सिमेंट डेपो
नालीदार पत्रे, कलर कोटेड पत्रे, सिमेंट पत्रे, फायबर पत्रे,
सिमेंट, सनला, स्टिल, व पाईपचे होलसेल व रिटेल विक्रेते
पत्र्याचा कारखाना
TATA पत्र्याचे शो-रुम
: पत्ता :
सावतामाळी चौक, मोंढा रोड, बीड-४३१ १२२
Cell. 9225390000
9225380000


## रोटरी क्लबने १ हजार फराळ बॅग वाटप करून वंचितांची दिवाळी केली साजरी









१) रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनच्या वतीने वंचितांची दिवाळी आनंदात, उत्साहात करण्याचा संकल्प करण्यात आला. या अंतर्गत गरिब परिवारांना फराळ वाटप करणे, किराणा वाटप करणे, साड्या वाटप करणे तसेच पुरुषांना कपडे वाटप करणे असा उपक्रम घेण्यात आला.

२) गरिबांची दिवाळी गोड करण्यासाठी रो. संतोष टवाणी यांनी आपला परिवार या ठिकाणी वृद्ध महिला, वृद्ध पुरुष यांना किराणा किट देवून सहकार्य केले. तसेच रो. भारत शेटे यांनी सर्व महिलांना साड्या देवून पारिवारीक जबाबदारी पूर्ण केली तसेच रो. दिनेश लोळगे यांनी सर्व पुरुष मंडळींना कपड्यांची व्यवस्था केली याबद्दल आपला परिवार या संस्थेने रोटरी क्लबचे आभार व धन्यवाद दिले.

३) बीड जिल्ह्यातील पसायदान सेवा प्रकल्प ढेकणमोह, आदिवासी समीकरण रामनगर, गेवराई येथील बालकाश्रम, पाली येथील इन्फंन्ट इंडिया, आपला परिवार, केज येथील संस्था अशा बीड जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्थेला व संस्थेतील गरजवंतांना १ हजार फराळ बॅग वाटप करण्यात आली.

४) फराळ वाटप प्रोजेक्टमध्ये राजयोग फाऊन्डेशन बीड या संस्थेने सहभाग घेतला तसेच सर्व रोटरी मेंबर्सनी ५ बॅग फराळ, १० बॅग फराळ अशा विविध प्रकारे मदत करून त्या प्रोजेक्टला हातभार लावला. त्याबद्दल अध्यक्ष,सचिव यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. रो.डॉ. सुरेंद्र बजाज, रो.डॉ. शिवाजी देशमाने, रो. संतोष पडुळे, रो. लक्ष्मण मळेकर यांनी प्रोजेक्ट यशस्वी केला.

## बुक ऑन रोटरी व्हील अंतर्गत रोटरी लायब्ररी अभियानास सुरुवात








१) बुक ऑन रोटरी व्हील अंतर्गत रोटरी लायब्ररी अभियान सुरुवात करण्यात आले आहे. या अंतर्गत ऑनलाईनच्या काळामध्ये विद्यार्थ्यांना मोबाईलपासून दूर ठेवून वाचन संस्कृतीचा विकास करणे व वाचन संस्कृती उदयास आणणे हा मुख्य उद्देश आहे.

२) रोटरी लायब्ररी अंतर्गत संस्कृती विद्यालय व विवेकवर्धिनी गुरुकुल या ठिकाणी विद्यार्थ्यांना ३५० विविध प्रकारचे पुस्तके देण्यात आली. ही पुस्तके सर्व विद्यार्थी १ महिन्यामध्ये वाचन करतील व त्या पुस्तकातील काही महत्वाच्या बाबी लिखान करून स्वत: व्यक्त होतील असा संकल्प करण्यात आला.

३) रोटरीयन अमोल तळेकर यांनी ३५० पुस्तकांचा संच रोटरीच्या या उपक्रमासाठी दिला व तो मोफत स्वरुपात देण्यात आला आहे. याबद्दल क्लबतर्फे व सर्व रोटरीयनतर्फे त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

४) रोटरीने बुक ऑन रोटरी व्हील अभियानाची पाहणी केली असता त्याठिकाणी सर्व विद्यार्थी मोकळ्या मैदानामध्ये वेगवेगळी पुस्तके वाचत असताना, मनन करत असताना, चिंतन करत असताना निदर्शनास आले. यामुळे रोटरीचे अध्यक्ष, सचिव व सर्व सभासदांनी या प्रोजेक्टबद्दल समाधान व्यक्त केले. येणाऱ्या महिन्यामध्ये ही पुस्तके प्रत्येक शाळेला एका महिन्यासाठी देण्यात येणार आहेत.

स्पर्धा परीक्षा क्षेत्रातील महाराष्ट्रातील अग्रगण्य संस्था...!
जिद्द | ज्ञान | सामर्थ्य ™
जिज्ञासा करिअर अकॅडमी, बीड
01 नागरी सेवा परीक्षा
02 राज्यसेवा परीक्षा
03 दुय्यम सेवा परीक्षा
04 गट-क सेवा परीक्षा
05 सरळसेवा परीक्षा
श्री.पारनेरकर महाराज मंदिर शेजारी, गोविंद नगर, माने कॉम्प्लेक्स ते नाट्यगृह रोड, बीड (02442) 221040, 8055221040

## शिबीर क्र.३ रोटरी क्लब आणि गुजराती समाज यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबीर संपन्न





**रोटरी क्लब व गुजराती समाज यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रो.संतोष टवाणी यांनी ४३ व्या वेळी रक्तदान केले तसेच ॲनेट्स रजनी गाडेकर या मुलीनेही या उपक्रमामध्ये सहभाग घेतला.**

बीड शहरामध्ये सिव्हील सर्जन डॉ. अशोक थोरात यांनी रक्ताचा तुटवडा जाणवत असल्यामुळे विविध सामाजित संस्थेला रक्तदान करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यांच्या आव्हानाला रोटरी क्लबने प्रतिसाद देऊन रक्तदान शिबीर घेण्याचे ठरवले. या शिबीरामध्ये गुजराती समाज बीड यांनाही सहभागी करून घेतले. गुजराती समाज आणि रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने १८ व्यक्तींनी व महिलांनी रक्तदान शिबीरामध्ये उत्स्फुर्त सहभाग नोंदविला आणि रक्तदान शिबीर यशस्वी केले. यावेळी गुजराती समाज बीड चे अध्यक्ष रो.हितेश ठक्कर, सचिव रो.महेश बुद्धदेव, रोटरीचे अध्यक्ष रो.इंजि.नितीन गोपन, सचिव रो.डॉ. निलेश जगदाळे यांनी शिबीर यशस्वी होण्यासाठी मेहनत घेतली. या शिबीरासाठी रोटरी क्लबचे सर्व सभासद तसेच गुजराती समाज बीड चे सर्व सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते. शिबीर यशस्वी झाल्यानंतर गुजराती समाज आणि रोटरी क्लब यांनी येणाऱ्या काळामध्ये विविध सामाजिक उपक्रम राबवण्याचा संकल्प केला.

## रोटरीने बिंदुसरा प्रकल्प परिसर स्वच्छता अभियान राबवुन प्रकल्प स्वच्छ व सुंदर केला









रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनच्या वतीने बीड तालुक्यातील प्रसिद्ध बिंदुसरा प्रकल्प या वेळेस पूर्ण भरल्यामुळे पर्यटकांची संख्या खुप मोठ्या प्रमाणामध्ये वाढली होती. त्या ठिकाणी पर्यटक व शहरातील नागरिक विशेष प्रकल्प पाहण्यासाठी व पर्यटनासाठी येत असत. त्यामुळे त्याठिकाणी प्रकल्प प्रदुषित झाला होता. यामध्ये कॅरिबॅग, शेंगदाण्याचे टरफल, शिल्लक राहिलेल्या भाकरी, कणसाचा पाला अशा प्रकारे खुप मोठ्या प्रमाणामध्ये प्रकल्प दुषित झाला होता त्यामुळे या प्रकल्पाचं वैभव राखण्यासाठी रोटरीने स्वच्छता अभियान राबवले व संपुर्ण परिसर स्वच्छ व सुंदर करून घेतला. यामध्ये आनंद ग्रामचे श्री दत्ताभाऊ बारगजे व त्यांचे सर्व विद्यार्थी सहभागी झाले होते. तसेच सर्व रोटरीयननी यामध्ये विशेष सहभाग घेतला. प्रोजेक्ट चेअरमन म्हणून रो. इंजि. राहुल बोरा, रो. डॉ. शिवाजी देशमाने यांनी विशेष मेहनत घेतली. तसेच रोटरीतर्फे त्याठिकाणी सिमेंट डस्टबीन ठेवून कचरा टाकण्याची व्यवस्था करण्यात आली. यावेळी कचराकुंडी साठी विशेष आर्थिक मदत रो.जनार्दन दहिवाळ, रो.इंजि. राहुल बोरा, रो.चंद्रप्रकाश सेठी यांनी विशेष पॉन्सरशिप दिली होती.


Mathemagic
Explore world of Maths

# MATHEMAGIC
## By Dolly Jain

* CBSE, ICSE अभ्यासक्रम
* 3rd ते 5th सर्व विषय
* 6th ते 10th गणित
* होमवर्क व परीक्षांविषयी मार्गदर्शन

Follow our YouTube Channel
*Mathemagic by Dolly Jain*

* कोटा(राजस्थान) येथील नामांकित संस्थांमध्ये शिकवण्याचा अनुभव.
* गणिताचा पाया पक्का करण्यासाठी विशेष लक्ष.

Mob. 8380876963

# जगा आणि जगु द्या..!
# आनंदी जीवनाचा मुलमंत्र -रो.जनार्दन दहिवाळ



फार गंभीर बनून जगू नका. हे विश्व करोडो वर्षापासून आहे. कित्येक आले आणि गेले. कुणावाचून कुणाचे थांबत नाही. जे व्हायचे ते होत राहणार आहे. तुम्हाला विचारून काही घडणार नाही. या जगात आपले काहीच नाही. त्यामुळे काही गमावल्याचे नु:ख करू नका. मी अमूक, मी तमूक असा अहंकार बाळगू नका. सर्वांशी प्रेमाने रहा. स्वत:चा भरवसा नसतांना इतरांना संपवण्याची भाषा बोलू नका. इतिहासातील कुरापती काढून वर्तमान खराब करू नका. त्यांचे जीवन ते जगले. तुम्ही तुमचे जीवन जगा व इतरांना जगू द्या. खरेतर काळ बदलला आहे. आपली खरी गरज काय आहे ते ओळखा. उगीच फालतू गोष्टीत नाक खुपसू नका. हजारो प्रकारचे संकट घोंघावत असतांना, क्षुल्लक गोष्टीने विचलित होऊ नका. जीवन गमतीने जगा, जरा मोकळेपणाने हसा, इतरांनाही आनंदी करा. लक्षात ठेवा तुमच्या गंभीरपणाने कुणाचेही भले होणार नाही. साऱ्या जगाचा विचार करू नका. नसती चिंता करू नका. लहान सहान गोष्टींचा आनंद घ्या. सतत गंभीर बनू नका. इतरांशी मोकळेपणाने बोला. त्यामध्ये कमीपणा मानू नका. तुम्ही स्वत:ला काही ही समजले तरी निसर्गाच्या पुढे तुम्ही फक्त एक जीव आहात. कुणाचाही द्वेष करु नका. सूडबुद्धीने वागू नका. आपल्या अवतीभोवतीचे जग बघा. किती गंमत आहे हिरवागार निसर्ग तुम्हाला खुणावत आहे. चोहीकडे मुंग्यांची रांग बघा. पाखरांचे थवे बघा. बघा कावळ्याची स्वच्छता, खळखळणारा समुद्र तुमच्या सोबतीला आहे. त्याच्या उसळणाऱ्या लाटा तुम्हाला खुणावत आहेत. विचारा त्या कोकीळेला, इतकी सुंदर कशी गातेस? विविध रंगाची फुले बघा. आयुष्यात विविध रंग भरा. नवी ठिकाणे, नवी माणसे यांच्याशी मैत्री करा. निसर्गाच्या सानिध्यात जा देवदर्शन करा, नातेवाईकांना वेळ द्या, प्राण्यांशी संपर्क ठेवा, त्यांचे जगणे बघा. कटकटी कमी करा. अधिक आनंदी जगा ! आनंदाने जगण्यासाठी सर्वांना शुभेच्छा...!

## रोटरी परिवाराचा दिपावली महोत्सव आनंदात-उत्साहात संपन्न






## रोटरी क्लबतर्फे सर्व मेंबर्सना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

रो. जयप्रकाश काविन्ना- ११ डिसें.
रो. अतुल संघानी- १८ डिसें.
श्री. प्रकाश करपे- २३ डिसें.

## रोटरी क्लबतर्फे सर्व ॲनेटस्‌ना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

शुभम कदम- ०३ डिसें.
(रो.संगिता सपकाळ यांचे चिरंजीव)
आस्था अतुल संघानी- ०४ डिसें.
निलेश राम व्हरकटे- ०५ डिसें.
रघुनंदन मदन काबरा- ०९ डिसें.
संकेत संतोष टवाणी- १० डिसें.
शौर्य राहुल कुलकर्णी- १० डिसें.
विश्वेश मनोज थिगळे- ११ डिसें.
गौरव राजकुमार बंब- १२ डिसें.
दिव्या भारत शेटे- २२ डिसें.
कल्पित सुर्यकांत महाजन- २६ डिसें.
सुखदा सुर्यकांत महाजन- २६ डिसें.
अमर संजय गुप्ता- २७ डिसें.

## रोटरी क्लबतर्फे सर्व रोटरीयन व ॲन्स यांना लग्न वाढदिवसाच्या शुभेच्छा!

रो.राहुल कुलकर्णी- २ डिसें.
रो.डॉ.अनिता शिंदे- ३ डिसें.
रो. अरविंद निंबाळे- १० डिसें.
रो. संजय गुप्ता - १० डिसें.
रो. अमोल तळेकर- १३ डिसें.
रो. रुपेश मुंदडा- १३ डिसें.
रो.डॉ.सिताराम आळणे- १३ डिसें.
रो.डॉ.प्रविण ढगे- २० डिसें.
रो. राजकुमार कुकडेजा- २० डिसें.
रो. राजकुमार बंब- २१ डिसें.
रो.डॉ. प्रदिप आघाव- २५ डिसें.

## ऑक्टोबर महिन्यातील १००% उपस्थिती

पॉन्सरशिप
रो.अभिजितसिंह ठाकूर

रो.इंजि.नितीन गोपन
रो.डॉ.निलेश जगदाळे
रो.हरिष मोटवाणी
रो.भारत शेटे
रो.इंजि.राहुल बोरा
रो.दिनेश लोळगे
रो.सुरेश बुद्धदेव
रो.प्रा.राजेंद्र गाडेकर
रो.जनार्दन दहिवाळ
रो.जितेंद्र बोरा
रो.सर्वज्ञ जोशी
रो.अमोल तळेकर
रो.प्रा.नितीन भोसले
रो.बालाजी घरत
रो.डॉ.शिवाजी देशमाने
रो.संतोष पडुळे
रो.संगिता मनसबदार
रो.लक्ष्मण मळेकर

## रोटरी क्लबतर्फे सर्व ॲन्स यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

सौ.भक्ती बुद्धदेव- १३ डिसें.
सौ.सुनिता चरखा- २८ डिसें.

ॲनेट्स रजनी गाडेकरची उत्कृष्ट कलाकृती!





## रोटरी फॅमिलीची कोजागिरी पौर्णिमा संपन्न





स्टॉकिस्ट ॲन्ड डिलर्स
*कारपेट *मॅटींग
*फोम *कुशन *क्वायर
*रेडीमेड पडदे
*रेक्झीन *बेड शिट्स
*गादी *वेलवेट
*फर्निशिंग *वॉलपेपर

सजावट
25
गृह सजावटीचे भव्य दालन
मुनोत कॉम्प्लेक्स, पुना गाडगीळच्या खाली,
सुभाष रोड, बीड - ४३१ १२२

रौप्य महोत्सवी वर्षात यशस्वी पदार्पण...
चंद्रप्रकाश सेठी
मो. 7588 85 85 85
9511 809 409